08-04-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 04/07/2025 11:35 PM Page 1



# वेळेचे नियोजन केल्यास परीक्षेत यश निश्चित

## समुपदेशक सुषमा कवठणकर यांचे प्रतिपादन : आंबिये महाविद्यालयात विशेष व्याख्यान उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**विर्नोडा, दि. ७ :** परीक्षेच्या पूर्वी आणि परीक्षेच्या कालावधीत वेळेचे योग्य नियोजन केल्यास कोणत्याही तणावाला सामोरे जावे लागणार नाही, शिवाय परीक्षेत घवघवीत यश मिळेल, असे प्रतिपादन आंबिये महाविद्यालयातील समुपदेशक सुषमा कवठणकर यांनी केले.

कोकणी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या परीक्षेच्या दृष्टिकोनातून तणावाचे व्यवस्थापन या विषयावरील विशेष व्याख्यानात बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ.ल्युसी जेम्स, कार्यक्रमाच्या मुख्य संयोजिका कोकणी विभागातील प्राध्यापिका मानसी धाऊसकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना उपप्राचार्य आणि प्रभारी कोकणी प्रमुख डॉ. ल्युसी जेम्स यांनी या विशेष व्याखानाचे आयोजन केल्याबद्दल संयोजिका प्रा. मानसी धाऊसकर यांचे कौतूक केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. प्रा. मानसी धाऊसकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले. मुख्य मार्गदर्शक समुपदेशक सुषमा कवठणकर यांची ओळख आर्या राऊत यांनी करून दिली. सूत्रसंचालन सानिका गावकर यांनी केले तर आभार नम्रता सामंत यांनी मानले. यावेळी विद्यार्थ्यांसह महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.



विर्नोडा : मुख्य मार्गदर्शक समुपदेशक सुषमा कवठणकर, महाविद्यालयाच्या उपप्राचार्या आणि आणि प्रभारी कोकणी प्रमुख डॉ. ल्युसी जेम्स, व्याख्यानाच्या मुख्य संयोजिका प्रा. मानसी धाऊसकर, प्राध्यापक वर्ग व मान्यवर.

**सोशल मीडियाचा वापर टाळा**

परीक्षेच्या वेळी शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे स्वास्थदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. ते व्यवस्थित राखणे प्रत्येक विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईल आणि सोशल मीड्यािचा वापर टाळावा, त्यामुळे कोणत्याही प्रकारचा तणाव उद्‍भवणार नाही.

**प्रभावी सादरीकरणामुळे विद्यार्थी भारावले**

समुपदेशक सुषमा कवठणकर यांनी पारंपरिक व्याख्यानपद्धतीला छेद देत पीपीटी सादरीकरणासह विद्यार्थ्यांना सहज आणि सुलभपणे विषय समजावून सांगितल्याने विद्यार्थ्यांना या व्याख्यानाचा खूपच लाभ झाला. शिवाय व्याख्यान संपल्यानंतर १० मिनिटे ध्यानधारणेचे महत्त्व सांगून ते विद्यार्थी आणि शिक्षकांकडून करून घेतल्याने त्याचा फायदा विद्यार्थी व शिक्षकांनाही झाला.

# बांद्यात श्रीरामनवमी उत्साहात साजरी

टीम दैनिक हेराल्ड

बांदा, दि. ६ : येथे श्रीरामनवमीचा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. बांद्यातील श्री विठ्ठल मंदिर,श्री बांदेश्वर मंदिर,श्री साईबाबा मठ ,संत सोहिरोबानाथ आंबिये मठ तसेच श्रीराम पंचायतन मंदिर,पानवळ येथे हा सोहळा साजरा करण्यात आला. बांदा श्री विठ्ठल मंदिरात दुपारी ठिक १२ वाजता रामनामाच्या जयघोषात प्रभु श्रीरामाला पाळण्यात घालून झोके देण्यात आले.सर्व भाविकांनी पुष्पवृष्टी केली.त्यानंतर ढोलताशांच्या गजरात पालखी फेरी निघाली.श्री बांदेश्वर मंदिरामध्येही याच वेळेत भाविकांच्या उपस्थितीत रामन्मसोहळा होऊन श्रींची सवाद्य पालखी फेरी निघाली. मार्गात दोन्ही पालख्यांच्या वार्षिक भेटीचा सोहळा झाला.गावातील देवतांना भेट देऊन दोन्ही पालख्या मंदिरात परतल्या.बांदा येथिल श्री साईमठ , संत सोहिरोबानाथ आंबिये मठ तसेच पानवळ येथिल श्रीरामपंचायतन मंदिर येथेही श्रीरामनवमी निमित्त दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

# महालक्ष्मी हायस्कूल १०० टक्के निकाल

टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ७ : कुडणे साखळी येथील महालक्ष्मी हायस्कुलचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला. विद्यालयातून ४० विद्यार्थी परीक्षेला बसले होते.यापैकी ११ विशेष श्रेणीत,१७ प्रथम श्रेणीत,१२द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. आकांक्षा गुणाजी हिने ९०.३ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळविला. सोहम ढवळे याने ९० टक्के गुण मिळवून द्वितीय स्थान तर सर्वेश गावस याने ८९.१६ टक्के गुण मिळवून तृतीय स्थान प्राप्त केले. विद्यालयाच्या या निकालाबद्दल व्यवस्थापक मंडळाने शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.


**CHANGE IN NAME**

I **AURORA COLACO** R/O H NO 122/A, GANTAMOROD, AQUEM BAIXO, NAVELIM, SALCETE, GOA like to change my name from **AURORA JOAQUIM VAZ** to **AURORA COLACO.** Hereafter in all my dealing and documents I will be known by the name **AURORA COLACO.**

**IN THE COURT OF THE JOINT MAMLATDAR-III OF TISWADI TALUKA AT PANAJI**

**Case No. MND/DEC/TAL/16/2014/JM-III**

1. Shri. Anselmo Estrocio
R/o H.No. C-385,
Nairelem Morod, Taleigao, Ilhas Goa.
**...Applicants**

V/s

Mr. Rodolfo Viegas
**...Opponents**

To,
The Respondents
4. Mr. Julio Antonio Bruno de Menezes
5. Mr. Michael Peter Camilo Menezes
6. Ms. Maria Frida Silva Menezes
All R/o Alto Porvorim, Near State Bank Colony, Porvorim, Bardez Goa.

**NOTICE**

**Notice under order 5 of Rule 20(1-A) of Civil Procedure Code, 1908.**

Whereas the above applicants have made an application in this court under section 8-A r/w Section 29(4) of the Goa, Daman and Diu Mundkar (Protection from Eviction Act), 1975.

And whereas the notices issued to the Respondents Nos. 4 and 6 are returned unserved with postal remark "Party Expired" and Respondent No. 5 is returned unserved with postal remark " Party leaving out of India".

And whereas the applicant has prayed wide application 19/02/2025 for substitute service by publication on any Local newspaper as the applicants are not aware of the legal heirs of the said Respondents.

Therefore, notice is hereby given under Order 5 of Rule 20 (1-A) of Civil Procedure Code, 1908 to appear in this Court in person or by a pleader duly instructed and able to answer all such questions on **08/05/2025 at 10:30 A.M.**

Take notice that in default of your appearance on the date and time mentioned above, the matter will be heard in your absence.

Given under my hand and the seal of this Court on this 01st day of April, 2025.

SEAL Sd/- **(Dattaprasad Toraskar)**
Jt. Mamalatdar - III of Tiswadi Taluka
Panaji - Goa.

**IN THE COURT OF THE INSPECTOR OF SURVEY AND LAND RECORDS, VASCO-GOA**

**CASE No. 5/ISLR/MOR/DEM/SAN/01/2025.**
**Date:- 7/04/2025.**

1. Seema Crisna Porobo Chimulcar R/o. H.No. 88/A, Cotto, Fatorpa, Cuncolim-Goa. .....**Applicant**

V/S

1. Shalini Sharad Prabhu R/o. A-16/63, 2nd floor, Shyamali Apts, Kalini Sundernagar, Mumbai 400098, 2. Sachin Sharad Prabhu. 3. Anjali Sachin Prabhu Both R/o. F.No. 804, 10-1, Wing Phase-II, Bhumi park Nr. Masjid fire brigade Marve Road, Malad (West) Mumbai. 4. Saurabh Sharad Prabhu. 5. Sharda Saurabh Prabhu Both r/o. Shyamali Apts, Kalini Sunder Nagar, Mumbai 400098. 6. Vaman Vithal Bhat. 7. Minaxi Vaman Bhat Both r/o. Tolem, Piguinin, Canacona, Goa. 8. Sugandha Ulhas Sinai Borkar. 9. Ulhas Moroba Sinai Borkar Both r/o Nr. Shivim Temple, P.O. Borim, Ponda, Goa. 10. Ladu Sadashiv Sansgiri. 11. Nita Ladu Sansgiri Both r/o. H.No. 255, Nr. V.P. Sancoale, Mormugao South, Goa. 12. Madhubala Uday Sinai Talvodcar. 13. Uday Narayan Sinai Talvodcar Both r/o. Ambicanagar Hsg. Stym Chandrawado, Fatorda Margao Goa. 14. Satish Sadashiv Sansgiri. 15. Milan Satish Sansgiri Both r/o. Canca Bandh, P.O. Parra, Bardez, Goa. 16. Margerish Satish Sanzgiri. 17. Sadashiv Ladu Sanzgir R/o. H.No. 255, Nr VP. Sancoale, Mormugao. 18. Crisna Venkatesh Porob Chimulcar R/o. H.No. 88/A, Cotto, Fatorpa, Cuncolim-Goa. .....**Respondents**

**PUBLIC NOTICE**

**WHEREAS,** the above named applicant has moved an application dated 02/1/2025 for Demarcation of their share under section 114 of Land Revenue code 1968 in respect of property bearing Survey No. **21/9-I** Situated at **Sancoale** Village of Mormugao Taluka.

**AND WHEREAS**, applicant served the notices through Registered A.D. to the Co-Owners of the said survey number.

**AND WHEREAS**, notices are returned back from the postal authority with the endorsement "Insufficant Addresses/ Party left/ Not Known/ expired and out of station.

**AND WHEREAS,** the applicant has made an application on 28/2/2025 along with the Affidavit and prayed for Substitute service by publishing in the local daily News paper as the applicant is unaware to submit the detailed addresses of the above opponents and their legal heirs.

**AND WHEREAS**, I am satisfied that this is a fit case for grant of such publication in any Local daily Newspaper.

**AND WHEREAS,** it appears that you are adjoining holders/interested parties in above demarcation case hence notice is hereby given to you that demarcation of above said property **is fixed on 25/04/2025 at 10.30 am onward.**

The applicant shall take note that failing to remain present or not complying with the above instruction, application will be rejected. The respondents shall take notice that in default of your presence; the work will be carried out in your absence.

**NOW THEREFORE**, notice is hereby given again to all the above opponents and all interested parties **to appear on 05/05/2025 at 11:30 AM** to file their say on the said date and time, failing which the matter will be heard and determined in their absence.

Given under my hand and the seal of this Court on this the 7th day of April, 2025.

Seal Sd/-
**(Anand V. Vaigankar)**
Inspector of Surveys And Land Records,
City Survey, Vasco Goa.

*Sandeep Ads*




केरी पेडणे : न्यू इंग्लिश हायस्कुलच्या यशवंत विद्यार्थ्यांसोबत शालेय व्यवस्थापनाचे पदाधिकारी व्रजेश केरकर, विठ्ठल गडेकर, दत्ताराम नाईक, आनंद शिरगांवकर वं शिक्षक वर्ग.

# केरी न्यू इंग्लिश हायस्कूलची १०० टक्के निकालाची परंपरा कायम

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ७ :** पेडणे तालुक्यातील केरी तेरेखोल परिसर विकास, कल्याण आणि शिक्षण संस्था संचालित न्यू इंग्लिश हायस्कूलचा गोवा शालांत मंडळाने घेतलेल्या २०२४-२५ वर्षीच्या दहावी बोर्ड परीक्षेत १०० टक्के निकाल लागला.

या शाळेत समृद्धी सावंत हिने ९२ टक्के गुण मिळवीत प्रथम येण्याचा मान पटकावला. सर्वम तळकर याने ८५ टक्के गुण मिळवून दुसरा आला. श्रुती संजय साळगावकर हिने ८४ टक्के गुण प्राप्त करून तिसरा क्रमांक पटकवला. तर गौरी सतीश मराठे (८३%), तेजल हेमंत तळकर (७९%) आणि प्रतीक्षा मेघशाम काळोजी (७७%) हे विद्यार्थी विशेष श्रेणित उत्तीर्ण झाले.

या वर्षी शाळेत एकूण सहा विद्यार्थी विशेष श्रेणीत, पंधरा विद्यार्थी प्रथम श्रेणीत आणि दोन विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. समृद्धी सावंत हिने समाजशास्त्र विषयात ९८ गुण मिळविले. तसेच मराठी विषयात समृद्धी सावंत, गौरी मराठे व श्रुती साळगावकर यांनी नव्वदहून अधिक गुण प्राप्त करत गोवा मराठी अकादमी पुरस्कृत पुरस्काराचे मानकरी ठरले. या घवघवीत यशाबद्दल त्यांचे व सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शालेय व्यवस्थापनाचे अध्यक्ष व्रजेश केरकर, व्यवस्थापक शैलेंद्र कुबल, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक शिक्षक संघ आणि केरीतील ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# साखळी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल

## ऐतिहासिक स्थळांची पाहणी; वाणिज्य विभागाचा पुढाकार

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ७ :** कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, साखळी येथील वाणिज्य विभागातील पर्यटन आणि आतिथ्य व्यवस्थापन विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी रेईश-मागूस किल्ला, गोवा राज्य वस्तू संग्रहालय, पणजी, सेंट ऑगस्टीन टॉवर (जुने-गोवा) येथे क्षेत्रीय सहलीचे आयोजन केलेले होते. या क्षेत्रीय सहलीत एकूण ३४ विद्यार्थी सहभागी झालेले होते. या सहलीचा उद्देश ऐतिहासिक पर्यटन आणि आतिथ्य व्यवस्थापन या विषयासंबंधित विद्यार्थ्यांची समज वाढविणे हा होता. या क्षेत्रीय सहलीचे संयोजन आणि आयोजन प्राचार्य डॉ. नामदेव गावस आणि प्रा. स्नेहा गावकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी आणि प्रा. नवमी सावंत उपस्थित होत्या.



> विद्यार्थ्यांची ऐतिहासिक आणि धार्मिक पर्यटन स्थळांकडे पाहण्याची दृष्टी अधिक सकस आणि दर्जेदार व्हावी, पर्यटनस्थळांसंदर्भातील बारकावे त्यांच्या लक्षात यावेत यासाठी या शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आलेले होते.
>
> **- डॉ. नामदेव गावस,**
> **प्राचार्य, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, साखळी.**

सहलीची सुरुवात पोर्तुगिजांनी सर्वांत जुन्या किल्ल्यांपैकी एक असलेल्या रेईस मागूस किल्ल्याच्या पाहणीपासून झाली. त्यानंतर सांस्कृतिक श्रीमंती अधोरेखित करणाऱ्या पणजी येथील गोवा राज्य वस्तुसंग्रहालयाला विद्यार्थ्यांनी भेट दिली. आदिलशाह राजवाडा म्हणून प्रसिद्ध असलेल्या या संग्रहालयातील पुरातत्त्वीय वस्तूंची पाहणी विद्यार्थ्यांनी केली. गोवा राज्य वस्तुसंग्रहालयाला भेट दिल्यानंतर विद्यार्थ्यांनी जुने गोवा येथील सेंट ऑगस्टीन टॉवरला भेट देऊन तेथील धार्मिक व स्थापत्य वारसा समजून घेतला.

# गावातील विजेची समस्या सुटणार

▶ डिचोलीसाठी ५२ कोटींची तरतूद : नानोड्यात ५२ लाख खर्चून नवीन वीज ट्रान्सफॉर्मर

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ७ :** डिचोली मतदारसंघासाठी वीज खात्यातर्फे विजेसाठी ५२ कोटी खर्चाची तरतूद अंदाजपत्रकात केली आहे. त्यातील २७ कोटी खर्च थिवी सबस्टेशन ते लामगाव सबस्टेशन ३३ केव्ही वीज जोडणी तर उरलेला खर्चात संपूर्ण लाटंबार्से परिसरात भुयारी ११ केव्ही वीज जोडणी केली जाणार आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात विजेची समस्या डिचोली मतदारसंघात कायमची सुटेल, असे डिचोलीचे आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांनी सांगितले.



नानोडा येथील श्री सातेरी केळबाई पुरमार मंदिराच्या जागेत ५२ लाख खर्चून नवीन वीज ट्रान्सफॉर्मरच्या उद्घाटनप्रसंगी आमदार डॉ. शेट्ये बोलत होते. याप्रसंगी जिल्हा पंचायत सदस्य प्रदीप रेवोडकर, स्थानिक पंच नीलम कारापूरकर, पंच पूजा घाडी, नरेश गावस, देवस्थानचे पुरोहित प्रमोद केळकर, योगेश गावकर, उत्तर गोवा जिल्हा भाजप महासचिव विश्वास गावकर, माजी सरपंच श्याम हरमलकर, डिचोली वीज खात्याचे सहायक अभियंता समीर चोडणकर, कनिष्ठ अभियंता कर्मचारी वर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री डॉ. सावंत यांचे या कामासाठी चांगले सहकार्य लाभले असून वीजमंत्र्यांचे ही आभार व्यक्त केले. काही तांत्रिक अडचणीमुळे नानोडा या भागात विजेच्या कमी दाबामुळे मोठी समस्या होती याचे कारण म्हणजे नानोडा हा भाग मध्यठिकाणी येत असल्याने त्यांना एक तर लामगाव किंवा साळ या सब स्टेशनवर अवलंबून रहावे लागत होते. परंतु, पुढच्या वर्षापासून ही समस्या सुटणार असल्याचे आमदार डॉ. शेट्ये यांनी सांगितले.

स्थानिक पंच नीलम कारापुरकर यांनी कित्येक वर्षाची मागणी पूर्ण झाल्याने आमदारांचे आभार मानले. फित आणि नारळ वाढवून वीज ट्रान्सफॉर्मरचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. सूत्रसंचालन व आभार विश्वास गावकर यांनी मानले.

# ध्येय साध्य करण्यासाठी स्वत:ला कणखर बनवा : प्रा. मराठे

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ७ :** इतरांच्या सूचना अथवा सल्ले यांनी हताश होऊन भरकटून जाण्यापेक्षा ध्येय साध्य करण्यासाठी स्वत:ला कणखर बनवा, असे प्रतिपादन साखळी सरकारी महाविद्यालयातील भौतिकशास्त्राच्या माजी सहायक प्राध्यापिका सुखदा मराठे यांनी केले. संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य महाविद्यालय विर्नोडा येथील लिंग समानता आणि महिला कक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जागतिक महिला दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे या नात्याने त्या बोलत होत्या.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य जुवांव कोस्टा, सन्मानीय अतिथी उद्योजिका भागीरथी परब, महिलासाठी परिस्थिती जागरुकता आणि स्वसंरक्षण या विषयावरील अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे मार्गदर्शक बुधाजी हंसापूरकर, उपप्राचार्या डॉ.ल्युसी जेम्स, लिंग समानता आणि महिला कक्षाच्या समन्वयक डॉ. अमृता डिंगे, एसटीसीसी अभ्यासक्रमाचे समन्वयक लेफ्टनंट डॉ.सॅम ब्रागांझा आदी मान्यवर उपस्थित होते.

बीए द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी ज्योती मिश्रा यांनी पाहुण्याचा परिचय करून दिला. बीए द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी मानसी नाईक यांनी सूत्रसंचालन केले. तर आभार एसटीसीसी अभ्यासक्रमाचे समन्वयक लेफफ्टनंट डॉ. सॅम ब्रागांझा यांनी मानले.

लिंग समानता आणि महिला कक्षाच्या समन्वयक डॉ. अमृता डिंगे यांनी महिला दिनांचे महत्त्व आपल्या मनोगतात अधोरेखित केले. 'महिलांसाठी परिस्थिती जागरुकता आणि स्वसंरक्षण' या विषयावरील अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा समारोप यावेळी झाला. या अभ्यासक्रमातील सहभागी मुलींना मान्यवरांच्याहस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

मानवी समाजजीवनाला आकार देण्यात महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे, असे उद्गार महाविद्यालयाचे प्राचार्य जुवांव कोस्टा यांनी आपल्या मनोगतात काढले. महिलांच्या बहुआयामी क्षमतांची प्राचार्य जुवांव कोस्टा यांनी यावेळी प्रशंसा केली. तद्नंतर प्राचार्य जुवांव कोस्टा यांच्याहस्ते महाविद्यालय आणि महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ ठेवणाऱ्या हाउसकिपिंग स्टाफचा सन्मान भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

# केवळ विद्यादान नव्हे; माणूस घडवतो आम्ही..!

## आंबिये महाविद्यालयात चार नव्या अभ्यासक्रमांना प्रारंभ : अत्याधुनिक सुविधांचा विद्यार्थ्यांना मिळणार लाभ

■ टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. ७ :** विर्नोडा येथील संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालयात २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षाकरिता बीए आणि बी.कॉम या अभ्यासक्रमांबरोबरच नव्या आणि काळाशी सुसंगत अभ्यासक्रमांना प्रारंभ झालेला आहे. यामध्ये बीबीए, बीएस्सी बायोटेक्नॉलॉजी,


बीएस्सी सायकॉलॉजी, बीएस्सी स्पोर्ट्स आणि एक्सरसाईज या विषयांचा समावेश आहे. दि. ११ एप्रिलपासून उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावरून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू होणार असून या अभ्यासक्रमांसाठी ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. कामकाजाच्या वेळेत महाविद्यालयाच्या कार्यालयाशी विद्यार्थी व पालकांनी संपर्क साधून अधिक माहिती घ्यावी. तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जुवांव कोस्टा यांनी केलेले आहे.





**अभ्यासक्रमांची अत्यंत माफक फी**

संत सोहिरोबानाथ आंबिये महाविद्यालयात नव्याने सुरू झालेले अभ्यासक्रम हे अनुदानित असल्यामुळे या अभ्यासक्रमांची फी देखील अत्यंत माफक स्वरूपात आहे. त्यामुळे आर्थिक मागास असलेल्या विद्यार्थ्यांनाही याचा फायदा घेता येणार आहे. अन्य महाविद्यालयांमध्ये हे कोर्स सेल्फ फायनान्स तत्त्वांवर चालत असल्यामुळे या कोर्सची फी साठ-सत्तर हजारच्या पुढे आहे. मात्र आंबिये महाविद्यालयात या अभ्यासक्रमांची फी १२ हजारच्या आत असणार आहे. अनुदानित स्वरूपाचे हे कोर्स केवळ आंबिये महाविद्यालयातच उपलब्ध आहेत आणि हे कोर्स सुरू करणारे आंबिये महाविद्यालय राज्यातील पहिले महाविद्यालय आहे.



**अत्याधुनिक सुविधा, तज्ज्ञ मार्गदर्शक आणि करिअरची संधी**

नॅकचे 'ए' मानांकन प्राप्त असलेल्या या महाविद्यालयात अत्याधुनिक सुसज्ज ग्रंथालय, पूर्णपणे सुसज्ज जिमखाना, अत्याधुनिक आणि प्रशस्त स्मार्ट क्लासरूम यांचा समावेश आहे. व्यापक अनुभव असलेल्या अनुभवी व्यावसायिकांचे मार्गदर्शनही या अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

**विद्यार्थ्यांचा होणार सर्वांगीण विकास**

राष्ट्रीय पातळीवरील संस्थांशी केलेल्या सामंजस्य करारांमुळे विद्यार्थ्यांना तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून अतंर्दृष्टी आणि वास्तव जगाचा अनुभव मिळेल. गोवा सरकारची धोरणात्मक दृष्टी, गोवा विद्यापीठाशी संलग्न आणि गोवा सरकारच्या उच्च शिक्षण संचालनालयाचा पाठिंबा आंबिये महाविद्यालयातील या अभ्यासक्रमांना लाभल्यामुळे आंबिये महाविद्यालय विद्यादानाच्या पवित्र कार्याबरोबरच विद्यार्थ्यांमधून माणूस घडविण्याचेही कार्य जोमाने करत आहे.